ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 6 | Dec - 2015

Golden Research Thoughts

हैद्राबाद मुक्ती संग्रामातील सोलापूर शहराचे योगदान

किशोर जोगदंड
वसुंधरा कला महाविद्यालय जुळे, सोलापूर.

प्रस्तावना :-

ब्रिटीश राजवटीतून 'भारत मुक्त' झाल्यानंतर संस्थानिकांच्या प्रदेशातही स्वातंत्र्याचे लढे उभे राहिले. त्यापैकीच एक म्हणजे हैद्राबाद स्वातंत्र्य लढा होय. १७ सप्टेंबर १९४८ ला सातवा निजाम मिर उस्मानअली यांच्या जाचातून हैद्राबाद मुक्त झाले. त्यालाच मराठवाडा मुक्ती संग्राम असेही म्हणतात. हैद्राबादचा हा मुक्तीलढा होता की, स्वातंत्र्य लढा होता याविषयीची शाब्दिक अर्थबोधाची मिमांसा लक्षात न घेता भारतीय स्वातंत्र्यानंतर चाललेली लोकलढ्याच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याची चळवळ होती असे म्हणावे लागेल. या लढ्यामध्ये विविध विचारसरणीचे लोक होते. त्यात महिलांनीही भाग घेतला होता. प्रामुख्याने काँग्रेस, आर्य समाज, हिंदू महासभा, कम्युनिस्ट पक्ष या चार संघटनांमध्ये काम करणारे नेते व त्यांचे अनुयायी या लढ्यात होते.

दलित समाजातील काही व्यक्ती या लढ्यात होते. या सर्व घटकांच्या सहभागामुळे हैद्राबादचा मुक्तीसंग्राम हा लोकलढा झाला होता. या लढ्याचे सोलापूर-हैद्राबाद केंद्र होते, ही बाब विचारात घ्यावी लागेल. सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्याचे स्वातंत्र्यलढ्यामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.

१९४८ साली हैद्राबादच्या निजामाच्या जुलमी राजवटीमधून आपल्या देशबांधवाची सुटका करण्यासाठी हैद्राबाद मुक्ती आंदोलनाचे सोलापूर केंद्र बनले होते. याचे कारण म्हणजे हैद्राबाद स्टेटच्या सीमा या सोलापूर जिल्ह्याला चिकटलेल्या होत्या. हैद्राबाद स्टेट जेथून चालू होत असे त्याला 'मोगलाई' असे म्हणत होते. भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद मुक्ती आंदोलनात, शहर व जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी भाग घेतला. महत्त्वाची बाब म्हणजे या मुक्तीलढ्यासाठी भारतीय सेनेने सोलापूरहून प्रारंभ केला.

या कारवाईची श्वेतपत्रिका विधिमंडळात सादर करताना गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले की, "स्वार्थासाठी काहीही गुन्हा करण्यास मागे पुढे न पाहणारे अशा रांगड्या जातीय संघटनेच्या लहरीनुसार आज हैद्राबाद सरकार आपले धोरण ठरवित आहे.... विलिनीकरण हेच एकमेव असे या प्रश्नाचे उत्तर, दुसरी तडजोड नाही." ही सैनिकी कारवाई किती गरजेची होती यांचा अंदाज बांधता येतो.

सोलापूरातील जुम्मा मशिदीतील सभा :

अक्कलकोट तालुक्यातील तडवळ या ठिकाणी रझाकारांनी हल्ला करणार अशी घोषणा केली, तसा जाहिरनामा गावागावात डकविला होता. हैद्राबादच्या आसपासच्या ८० मैलावरच्या प्रदेशात जाळपोळ करण्यात आली. त्यामुळे लोक सोलापूर, पंढरपूर, बार्शी, विजापूर व संधराज्यातील खेडोपाडी लोक निर्वासित झाले म्हणून सोलापूरातील जुम्मा मशिदमध्ये महत्त्वपूर्ण सभा भरली. या सभेत मि. अब्दुल करीम वकिल यांनी सर्वधर्म समभावाचा उपदेश केला होता. या सभेत भाई छन्नुसिंग चंदेले, डॉ. अंत्रोळीकर, दे.भ. जाजू यांचीही भाषणे झाली. यावेळी ऑल इंडिया कमिटीचे सभासद लुंजे म्हणाले की, 'हैद्राबादच्या लढ्यास विनाकारण धार्मिक लढ्याचे स्वरुप देण्यात येत आहे तसेच हिंदुस्थान सरकार यांच्यामधील हा लढा नव्हे. निजाम प्रांतातील राजा व प्रजेचा लढा अशी या लढ्याची परिस्थिती आहे. राजा- महाराजाचा काळ आता आटोपला आहे. सर्व जगात बहुतेक ठिकाणी राजे-महाराजे आता नाहिसे झाले आहेत. लोकशाहीची ही उसळलेली लाट आता कोणीही अडवू शकणार नाही.' भाई छन्नुसिंग भाषण करताना म्हणाले की, "आमच्या संकटाच्या मार्गात या मशिदीसारख्या ईश्वराच्या घरात आम्ही कोणताही संकोच न बाळगता योग्य मार्गदर्शन न केल्यास तो ईश्वराच्या घरी गुन्हा होईल. हिंदुस्थान व पाकिस्तान प्रकरण आता संपले आहे. देश दुभंगला आहे ही गोष्ट चांगली झाली नाही. मात्र हिंदुस्थानात पाच कोटी मुसलमान सुखसमाधानात राहत आहेत, परंतु आपल्या शेजारच्या निजामी राज्यात हिंदुंना सुखरुप राहणे अशक्य झाले आहे. म्हणून निर्वासिताची काळजी घेती पाहिजे".[१] तर मि. हिफजूर रहिमान वकिल म्हणाले की, "हिंदुस्थानात न्यायाचे राज्य चालू आहे व विशेषत: गरीबाच्या कल्याणाकडे सरकार जास्त लक्ष देते. केवळ आम्ही वफादार राहू असे म्हणून चालणार नाही. त्याप्रमाणे आपण कृती दाखविली पाहिजे. हैद्रबादचा झगडा मिटविण्यास आपले सरकार समर्थ आहे. आपल्या शहराची शांतता टिकविण्याच्या कामी आपण प्रथम लक्ष दिले पाहिजे. त्यामध्येच आपणा सर्वांचे कल्याण आहे." अशाप्रकारे हिंदु-मुस्लिम समाजबांधवांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या लढ्याला कृती करण्याच्या ध्येयाने पाठींबा व मदतीस सुरुवात केली. धार्मिक तणावाच्या परिस्थितीत सोलापूरातील ही सभा निश्चितच विचारात घेण्यास भाग पाडते.

सोलापूरचा निजाम स्टेटविरुध्द लढा :

सध्याच्या आंध्रप्रदेशातील तेलंगणा भागातील शेतकरी व तेथील जनतेने वेठबिगारी विरुध्द निजाम स्टेट विरुध्द लढ्याला सुरुवात केली. या लढ्यात शेतकरी आणि कामगाराचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. रझाकारांच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या अनन्वीत छळ, अन्याय, अत्याचार, मारहाण, दिवसा स्त्रियांची अब्रु लुटणे अशा जाचाला कंटाळून सोलापुरात असंख्य लोक उदरनिर्वाहासाठी आले होते. परंतु तेलंगणातील काही निधड्या छातीच्या युवकांनी या अन्यायाविरुध्द लढण्यास सुरुवात केली. या क्रांतिकारक लढ्याला सोलापुरातील कामगारांनी जाहीर पाठींबा दिला.[२] या लढ्यात भाग घेतलेल्यांना आर्थिक मदत देण्याचे ठरवून सोलापूरातील आसामी व विणकर कामगारांनी एका समितीची स्थापना करुन या समितीच्या अध्यक्षस्थानी कॉ. अप्पाची नियुक्ती केली. मल्लप्पणा पुल्ली, आशण्णा इराबत्ती, कोंडा, लक्ष्मणराव बापुजी इत्यादी समाजातील मान्यवर लोकांनी भाग घेतला. तेलंगणातील कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यांनी निझाम सरकारचे हस्तक 'रझाकार' यांच्या विरुध्द तसेच वेठबिगारी करणाऱ्या जमिनदाराविरुध्द तीव्र लढा उभारला. 'कसेल त्याची जमीन' अशी मागणी करणारे अनेक शेतकरी, कामगार व कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते सशस्त्र लढा देऊन हुतात्मे झाले. "निझामी राजवटीने या परिस्थितीचा आपल्या अस्तित्वासाठी उपयोग करुन घेतला खरा पण स्थितीशीलता हेच मुळी ज्या सरंजामशाहीचे वैशिष्ट्य असते. तेथे कम्युनिस्टाच्या रुपाने संघटित झालेल्या प्रवाहाला तोही आवरु शकला नाही."[३] तेलंगणातील कम्युनिस्टाच्या सशस्त्र लढ्यामुळे निजामाविरुध्दचा लढा तीव्र बनला. या लढ्याला आर्थिक मदतीची आवश्यकता असल्यामुळे 'सहाय्यक समिती' ची स्थापना करण्यात आली व फंड जमविण्याच्या कार्याला जोमात सुरुवात झाली. त्याकाळी कॉ. व्यंकप्पा मडूर विजयवाडा येथे जाऊन तेथील भूमिगत पुढाऱ्यांची भेट घेतली. त्या भूमिगत पुढाऱ्यातील कॉ. यल्लारेड्डी यांना सोलापूरला घेऊन आले.[४] कारण त्यांना तेलंगणातील लढा तीव्र करायचा होता. त्यासाठी आवश्यक असलेले धन व पाठींबा मिळवायचा होता. त्यांच्या या कामाला सोलापूरातून भरभरुन प्रतिसाद मिळाला. हातमाग कामगार व आसामी यांच्याकडून मोठ्या परिश्रमाने १२ हजार रुपयांचा निधी गोळा करुन कॉ. अप्पा यांच्या अध्यक्षतेखाली भूमिगत कम्युनिस्ट पुढाऱ्याला देण्यात आला.

२७ ऑक्टोबर १९४७ रोजी साप्ताहिक लोकसेवा मध्ये 'तयारी करा पण घबराट नको' असा अग्रलेख लिहला होता. त्यामध्ये निजाम सरकारच्या दडपशाहीचे वाभाडे काढले. निजाम सरकारबद्दल अनादर व तिरस्कार निर्माण होत आहे म्हणून संघटित होऊन काम करण्याची गरज आहे, असा सल्ला देताना म्हटले की, "निजाम स्टेटशी आपल्या हक्काकरिता झगडणाऱ्या त्याच्या प्रजेने शेजारच्या प्रजेने इंग्रज सरकारशी कोणत्या मार्गाने झगडून यश मिळविले त्याच मार्गाने पण त्यागपूर्वक निर्भयतेने जास्त झगडून आपले उद्दिष्ट साध्य करण्यास शिकावे".[५] अशा प्रकारे संघर्ष करण्याची तयारीच करा, याविषयीची जागृती केली. निजामी राजवटीमध्ये शेतकऱ्यांची दैना होत होती म्हणून राझणी, शिरगाव येथील शेतकऱ्यांस खपली, बी व क, ड पत्रकाचे उतारे नियमित मिळावे, शेतकऱ्यांची कुचंबणा थांबवावी असे लोकसेवा मधून लिहून तुलशीदास जाधवांनी शेतकऱ्यांचे दु:ख मांडले.

क्रांतीसिंह नाना पाटील सोलापूर मध्ये आले होते. त्यांच्या सभा सोलापूर शहरामध्ये झाल्या होत्या, तेव्हा लोकसेवा साप्ताहिकातून 'नाना पाटील व हैद्राबाद जनता' या मथळ्याखाली अग्रलेख लिहला होता. यामध्ये असे नमूद केले की, "हैद्राबाद मधील जनतेस सहाय्य द्या, शेजार धर्माप्रमाणे मदत करा, शेतकरी कामकरी राज्य जास्तीत जास्त प्रमाणात वाढवा."[६] यामागे कारण असे होते की, निजाम सरकार हैद्राबादमधील जनतेवर अन्याय करत होते. त्यामुळे तेथील लोक मोठ्या प्रमाणात सोलापूरला आले, त्यामुळे त्यांना शेजारधर्म म्हणून आपण सांभाळले पाहिजे अशी त्यामागे भूमिका होती. क्रांतीसिंह नाना पाटील यांचा एक जरब होता. "नाना पाटील निजाम हद्दीत येणार म्हटले की, जशी शिवाजीची औरंगजेबाला दहशत बसली तशी नाना पाटलांची निजामाला बसली होती",[७] असे गौरवोद्गार या अग्रलेखातून काढले गेले. मरीआई चौकातील झालेल्या सभेत नाना पाटील यांनी "द्रौपदीच्या वस्त्रहरणाचा दृष्टांत देऊन निजाम सरकारच्या अत्याचाराची तुलना दुर्योधनाशी केली"[८] यावरुन त्यांच्या जहाल विचारांची जाणीव दिसून येते.

निजाम संस्थानामध्ये कार्यरत असलेल्या इत्तेहादुल मुसलमान या संस्थेने निजाम स्टेट हे मुस्लिमांचे राज्य आहे आणि त्यात मुस्लिमांचेच वर्चस्व राहील अशा पध्दतीने चळवळ सुरु केली आणि संघटना निर्माण करुन रजाकार या नावाचे बेकायदेशीर सैन्य तयार केले होते. त्या संघटनेचे अध्यक्ष कासीम रजवी होते. 'मुस्लिम संघटना व रजाकार यांनी भारताचे सार्वभौमत्व नाकारले.'[९] मुसलमानामध्ये धार्मिक भावना भडकावून हिंदूंवर अत्याचार करण्यास उत्तेजित केले. त्या अत्याचाराला तोंड देण्यासाठी हिंदूंना क्रांतिकारक कार्य हाती घेणे भाग पडले. या क्रांतिकारक टोळीचे नेते कोंडा लक्ष्मण बापूजी होते. ते व्यवसायाने फौजदारी वकिल होते तसेच सार्वजनिक क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवला, त्यामुळे ते प्रसिध्द झाले. या त्यांच्या क्रांतिकारक नेतृत्वामुळे त्यांच्या घराभोवती अटक करण्यासाठी दि. २६ जुलै १९४७ रोजी गराडा घातला. जबरदस्त पोलिस बंदोबस्त असताना लक्ष्मणराव सर्वांना चकवून रहस्यमय रितीने घराबाहेर पडले. २५ दिवसांपर्यंत हैद्राबाद शहरात अज्ञातवासात राहून त्यांनी क्रांतिकारक संघटना मजबूत केली. काही क्रांतिकारकांनी संस्थानात राहून व काही क्रांतिकारकांनी बाहेर राहून लढा दिला. पुढे लक्ष्मणरावांनी पठाणी वेशात संस्थानाच्या बाहेर पडून सोलापूर, पुणे, अहमदनगर व अहमदाबादपर्यंत दौरा करुन निजाम संस्थानातील अत्याचाराची जाणीव करुन दिली. त्यावेळी ते पहाडी या नावाने ओळखले जात होते.

सर्वसामान्यांचा पाठिंबा व मदत :

"सोलापूर जिल्हा काँग्रेस कारभाऱ्यांनी हैद्राबाद जनतेस पाठिंबा देण्याचा ठराव पास केला आणि घबराटीने स्थान त्याग करु नका", असा सल्ला ही दिला.[१०] थोडक्यात हैद्राबाद जनतेला हक्क मिळावेत व हैद्राबादने हिंदुस्थानच्या घटना समितीत सामील व्हावे या स्टेट काँग्रेसच्या ठरावाला पाठिंबा देणारा ठराव पास करण्यात आला. हैद्राबाद जनतेने घबराटीच्या वातावरणामुळे स्थान त्याग न करता तेथेच राहून गुंडगिरीचा प्रतिकार करावा असे आवाहनही केले.

विशेष म्हणजे हैद्राबाद लढ्यास हातमाग कामगार, आसामी व व्यापारी संघाचाही पाठिंबा होता. हैद्राबाद संस्थानातील वार्ता वाचून भडकून जाऊ नका. संपूर्ण शांत राहिल्यानेच हैद्राबाद लढ्यास मदत होणार आहे म्हणून निर्वासितांना मदत करण्यासाठी नरसिंग गिरजी मिल, सायझिंग खात्याकडून देणग्या दिल्या.[११] यासाठी नागया भुमया बेत यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. हैद्राबाद राज्यकर्त्यांविरुध्द जी चळवळ सुरु केली, त्यास पाठिंबा आहे. लढ्यास सहाय्य म्हणून हातामागे ८ आणे मदत द्यावी असे ठरले. व्यापाऱ्यांनी आपल्या मर्जीप्रमाणे मदत द्यावी असा ठराव मांडला. लालबावटा

युनियनचे कॉम्रेड व्यंकप्पा मडूर यांनी पाठिंबा देणारे भाषण केले, तर आसामी संघातर्फे श्री. रामदास अन्नलदास यांनी भाषण केले. तर हातमाग संघातर्फे श्री. नारायणराव इराबत्ती, सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळातर्फे श्री. रामचंद्र लछमया येमूल आपली मदत आणि स्वयंसेवकासाठी नावे द्यावी असे आवाहन केले.

निर्वासितांना स्त्रीयांनीही मदत केली. कलेक्टरची पत्नी सौ. ताराबाई घाटगे यांनी सरकारकडून लोकर मागवून स्वेटर्स, गंजीफ्रॉक, गरम कपडे स्त्रीयांन घेऊन विणले. त्यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी कार्य केले.[१२] याबरोबरच हैद्राबादच्या निराश्रितांसाठी सोलापूरच्या मारवाडी भगिनींकडून मदत म्हणून फंड उभारण्यात आला. हा फंड उभा करण्यासाठी आयोध्याबाई चंडक, सौ. गिताबाई राठी, सौ. रामकवरबाई झंवर या प्रचंड मेहनत घेतली.

नान्नज व गाणगापूर येथील रझाकारी हल्ले :

सोलापूर, उस्मानाबाद सरहद्दीवर असलेल्या नान्नज गावावर व भारतीय पोलिसांवर रझाकारांनी हल्ला करुन लुटमार व जाळपोळ केली. या प्रसंगावरुन रझाकार व स्वराज्याच्या सैन्यात ठिणगी पडली. त्यामुळे भारत सरकारने हैद्राबाद मुक्तीसाठी ॲक्शन घेण्याचे निश्चित केले.[१३] गाणगापूर-सोलापूर रेल्वे लाईनवर रझाकारांनी रेल्वे लुटली व स्त्रीयांवर अत्याचार केले. त्यामुळे भारतीय सरहद्दीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला.[१४] सोलापूर-बार्शी रस्त्यावरील नान्नज हे निजामाच्या संस्थानातील शेवटचे व मोठे गाव असल्याने या ठिकाणी निजामाची मोठी फौज होती. त्याचप्रमाणे रझाकाराचा मोठा अड्डा व आजच्या टोलप्रमाणे नान्नजमध्ये मोठा करोडगिरी नाका होता. मोठी साखळी लावून गाड्या अडवून मनमानी पध्दतीने वसुली केली जायची. गौडगावच्या कॅम्पवरील स्वातंत्र्यवीरांनी भरदिवसा नान्नजचा करोडगिरी नाका लुटून तेथील हत्यारे लंपास केली. त्यामुळे तेथे असणाऱ्या रझाकारांनी बार्शीकडे जाणाऱ्या भारतीय वायुसेनेच्या हेलीकॉप्टरने नान्नजच्या निजामकालीन इमारतींवर बॉम्ब टाकून त्या नेस्तनाबूत करुन नान्नज आपल्या ताब्यात घेतले. नान्नज आपल्या हातून जाणे हे निजामासाठी चिंताजनक असल्याने कर्नल हिमायतबेगच्या नेतृत्वाखाली एक तुकडी पाठविण्यात आली होती. एवढेच नाही तर खुद्द उस्मानअली खान निजामाने नकाशाद्वारे नान्नजचा आढावा घेतला. याशिवाय हैद्राबादमध्ये हजारो लोक नान्नजला परत जिंकून घ्या म्हणून रस्त्यावर उतरले होते. नान्नजच्या श्री. गंगाराम घोडके यांना याच दरम्यान पायात गोळी लागली होती.[१५] यातून हैद्राबाद संस्थानातील नान्नजचे महत्त्व लक्षात घेता येईल.

संदर्भ टिपा :

१) ४ जुलै १९४८, लोकसेवा साप्ताहिक, सोलापूर.

२) पूर्वेचा लालतारा, कॉ. व्यंकप्पा मडूर स्मृती स्मरणिका, प्रजा नाट्य मंडळ, सोलापूर, पृ.क्र. १३.

३) पंचधारा, हैद्राबाद मुक्ती विशेषांक, प्रकाशक द.पं. जोशी (म.सा.प.), आंध्रप्रदेश, प्रथम आवृत्ती, १९९९, पृ.क्र. ४२.

४) पूर्वेचा लालतारा, कॉ. व्यंकप्पा मडूर स्मृती स्मरणिका, प्रजा नाट्य मंडळ, सोलापूर, पृ.क्र. १३.

५) २७ जुलै १९४७, लोकसेवा साप्ताहिक, सोलापूर.

६) ८ डिसेंबर १९४७, लोकसेवा साप्ताहिक, सोलापूर.

७) ८ डिसेंबर १९४७, लोकसेवा साप्ताहिक, सोलापूर.

८) १ डिसेंबर १९४७, लोकसेवा साप्ताहिकचा अग्रलेख, 'क्रांतीवीर नाना पाटील- त्यांचा ज्ञानपूर्ण, नम्र, गोड स्वभाव.'

९) माझ्या आयुष्यातील टिपणे, अशण्णा लछमया इराबत्ती, पृ.क्र. ३९५.

१०) २३ जुलै १९४७, सोलापूर समाचार.

११) ८ नोव्हेंबर १९४७, सोलापूर समाचार.

१२) ११ नोव्हेंबर १९४७, सोलापूर समाचार.

१३) २८ जुलै १९५४, टाईम्स ऑफ इंडिया.

१४) लातूर डिस्ट्रीक्ट गॅझेटियर, गर्व्ह. ऑफ इंडिया, पृ.क्र. १४८.

१५) १ मे २०१५, दैनिक एकमत, सोलापूर आवृत्ती वर्धापन दिन.